# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 49) 1st January 2024 ( No. of Pages 08 ) ( No : 01


# भारतीय प्राध्यापक संघटनेचा सर्वश्रेष्ठ सरसेनापती

## प्रा. मृण्मय भट्टाचार्य यांचे दुःखद निधन


**प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*


अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे सन १९८० ते १९९९ या काळामध्ये म्हणजे जवळ जवळ वीस वर्षे महासचिव (General Secretary) म्हणून जबाबदारी पार पाडणारे ज्येष्ठ नेते प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांचे दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ रोजी कलकत्ता येथे दुःखद निधन झाले. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाची स्थापना झाल्यापासून तर सन २०२३ पर्यंत महासचिव पदावरून काम करण्याची इतकी प्रदीर्घ संधी मिळालेले ते एकमेव नेते होत. सातत्याने २० वर्षे ते महासचिव होते हे तर महत्त्वाचे आहेच पण त्या २० वर्षांच्या काळामध्ये जी अखिल भारतीय स्तरावरील दोन महत्त्वपूर्ण कामबंद आंदोलने झालीत तशी आंदोलने त्यांच्या पूर्वीच्या किंवा त्यांच्या नंतरच्या काळात कधीही झाली नाहीत, आंदोलने झाली हे तर महत्त्वाचे आहेच पण या दोनही आंदोलनांमध्ये केंद्रशासनाकडून लिखित आश्वासन पत्रे मिळल्यानंतरच ती आंदोलने मागे घेण्यात आली हे जास्त महत्त्वाचे आहे. आंदोलन समाप्तीच्या पूर्वी केंद्रशासनाकडून लेखी आश्वासन पत्र घेतल्यानंतरच आंदोलन समाप्त करण्यात आले असा प्रकार त्यांच्या पूर्वीच्या काळात किंवा त्यांच्या नंतरच्या काळात कधीही पहायला मिळाला नाही. आश्वासन पत्रे केंद्रशासनाकडून लिखित स्वरूपात मिळविली ही बाब महत्त्वाची आहेच पण विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक सेवाशर्ती व वेतनश्रेण्यांची पुनर्रचना या संदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण बाबी त्या आश्वासन पत्रामध्ये समाविष्ट होत्या हे जास्त महत्त्वाचे आहे.

भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये एखाद्या व्यावसायिक संघटनेने आंदोलन सुरू करण्याचा नुसता विचार करून चालत नाही तर त्यासाठी किती मजबूत तयारी केली पाहिजे याचा वस्तुपाठच आमच्या या नेत्याने घालून दिला. महासचिव पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सबंध देशभर दौरे करून निरनिराळ्या विद्यापीठ स्तरीय संघटनांना तसेच राज्यस्तरीय संघटनांना आंदोलनाची कशी तयारी करावी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. संघटनेचा विचार साधारणपणे सर्व लोकांपर्यंत व मुख्यत्वे आपल्या शिक्षकांपर्यंत पोहचला पाहिजे यासाठी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे आपले स्वतःचे नियतकालिक मुखपत्र असले पाहिजे अशा विचार करून "Teachers Movement" या मुखपत्राची नोंदणी करून ते सुरू करण्याचा बहुमान मिळविणारे महासचिव म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. जागतिक शिक्षक परिषदेचे सचिव म्हणून सन १९९८ ते २००७ या काळात त्यांनी काम केले. भारतीय प्राध्यापक संघटनेचा सर्वश्रेष्ठ सरसेनापती असा जो उल्लेख मी या लेखाच्या शीर्षस्थानी केलेला आहे तो केवळ औपचारिक उल्लेख नसून अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेपासून तर आजपर्यंतच्या काळातील घटनाक्रमाचा प्रत्यक्ष साक्षीदार म्हणून कोणत्याही कसोटीवर खरा ठरणारा तो उल्लेख आहे असे मी ठामपणे म्हणू शकतो अशी वस्तुस्थिती आहे. देशाच्या फाळणीतून आलेल्या संकटामुळे बालपणापासून एकामागून एक अनेक संकटांना त्यांना तोंड द्यावे लागले. त्यातून **"सर्व दारे जेव्हा बंद होतात तेव्हा कुठे तरी एखादी खिडकी उघडलेली असते. तेव्हा कोणताही प्रश्न अधांतरी सोडू नका ! मध्येच गलितगात्र होऊ नका ! (A window opens up when all doors have closed : Never Give Up)" हा जो धडा त्यांना मिळाला तो त्यांनी आयुष्यभर लक्षात ठेवला.** या धड्यातून प्राध्यापक संघटनासुद्धा लाभान्वित झाल्या.

२ . **जीवनाच्या धकाधकीमध्ये तरुणपणी अनेक संकटांचा सामना करण्याची नियतीने ज्यांच्यावर वेळ आणली असते त्यांना संकटांचा मुकाबला करतांना असा मुकाबला करण्याचे जे सामर्थ्य स्वाभाविकरीत्या प्राप्त होते ते सबंध जीवनभर एक शिदोरी म्हणून कामी येते.** इथे तर बालपणीच अशा संकटांचा सामना करण्याची वेळ मृण्मय यांच्यावर आली व ते संकटसुद्धा लहान सहान नव्हे तर भारताच्या फाळणीसारखे महाभयंकर संकट होते. त्यावेळेच्या अखंड भारतात, फाळणीनंतरच्या पाकिस्तानात आणि आताच्या बंगलादेशात असलेल्या फरीदपूर जिल्ह्यांतर्गत भादोरगंज पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या इरीकाठी या खेड्यामध्ये मृण्मय भट्टाचार्य यांचा जन्म झाला. इरीकाठी पासून काही अंतरावर असलेल्या राजशाही या शहरामध्ये त्यांचे वडील हे सिंचन विभागात शासकीय सेवेत होते.

३ . भारताच्या फाळणीचे वारे वाहू लागले त्यावेळेला इरीकाठी या खेड्यामध्ये काय? किंवा राजशाही या शहरात काय? हिंदू आणि मुस्लीम या दोन जमातीमधील वैमनस्य टोकाला पोहचले होते. वडील शासकीय सेवेत असल्यामुळे भारत आणि पाकिस्तानच्या फाळणीच्या वेळी इतर शासकीय सेवकांना देण्यात आलेला पर्याय म्हणजे पाकिस्तानात राहायचे की, भारतात राहायचे? हा पर्याय त्यांच्या वडिलांनासुद्धा उपलब्ध होता. राजशाही हे शहर पाकिस्तानात जाणार की, भारतात राहणार याचा विचार न करता कुटुंबातील सदस्यांनी याबाबतीत दिलेला सल्ला वडिलांनी मान्य केला नाही व राजशाही येथील शासकीय सेवेत कायम राहायचे ठरविल्यामुळे फाळणीनंतर त्यांना व त्यांच्या कुटुंबाला फार मोठ्या त्रासाला तोंड द्यावे लागले. कुटुंबातील सदस्य सुरक्षित असावे म्हणून आजच्या पश्चिम बंगालमधील कटवा या शहरात हे कुटुंब वास्तव्यासाठी आले.

४ . वडील पाकिस्तानातील राजशाही या शहरात शासकीय सेवेत आणि मृण्मय यांचे कुटुंब भारतातील कटवा या शहरात स्थायिक झालेले. कटवा शहरामध्ये एक मुलींचे विद्यालय व एक मुलांचे विद्यालय अशी दोनच विद्यालये होती. महाभारताचे बंगाली भाषांतरकर्ते 'काशीराम दास' यांच्या नावाने मुलांचे हायस्कूल होते. फाळणीमुळे त्यावेळेला आताच्या बंगलादेशातून भारतामध्ये मोठ्या प्रमाणात हिंदू लोकसंख्या स्थलांतरित झाल्यामुळे विद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी प्रयत्न करीत होते. या सर्व विद्यार्थ्यांना त्या एका हायस्कूलमध्ये प्रवेश मिळणे शक्य नसल्यामुळे कटवा या शहरातील काही सुखवस्तू लोकांनी पुढाकार घेऊन 'भारती भवन' या नावाने एक नवीन विद्यालय त्या शहरात सुरू केले व तेथे श्री.मृण्मय भट्टाचार्य यांना प्रवेश मिळाला. जून १९५८ मध्ये त्यावेळेच्या मॅट्रीक परीक्षेचा निकाल लागला आणि कटवा कॉलेजचे प्राचार्य संतोष दास यांनी पोस्टकार्ड पाठवून तो निकाल त्यांच्या राहत्या पत्त्यावर कळविला.

५ . कटवा शहरामध्ये महाविद्यालयीन शिक्षणाची कोणतीही व्यवस्था त्यावेळेला उपलब्ध नव्हती. हुगळी येथील मोहसीन कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. मोहसीन कॉलेजमधून बी.ए. ची पदवी घेतल्यानंतर बंदेल विद्यामंदिर हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.सुधीर मुखर्जी यांनी त्यांची शिक्षक म्हणून आपल्या विद्यालयामध्ये निवड केली. या ठिकाणी शिक्षक म्हणून नोकरी करीत असतांना त्यांनी कलकत्ता विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विषयातील एम.ए. पदवीसाठी प्रवेश घेतला. एका

# Never Give Up

( परिच्छेद १६ पहा )

बाजूला एम.ए.च्या वर्गात शिकणे आणि दुसऱ्या बाजूला हायस्कूलमध्ये शिकविणे हे दुहेरी काम त्यांनी सुरू केले. नोव्हेंबर १९६२ मध्ये M.A. (Economics) ची अंतिम परीक्षा त्यांनी दिली. याच दरम्यान ज्या राजकीय पक्षाकडे त्यांचा कल होता त्या कम्युनिस्ट पक्षामध्ये देशभरात फूट झाली आणि CPI व CPM असे दोन पक्ष अस्तित्वात आले.

**६.** एम.ए. परीक्षेचा त्यांचा निकाल जाहीर झाला आणि ती परीक्षा त्यांनी उत्तम रीतीने उत्तीर्ण केली. कलकत्त्याच्या राममोहन कॉलेजमध्ये त्यांना अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नेमणूक मिळाली. प्रा. सुधीर चक्रवर्ती हे त्यांचे विभाग प्रमुख होते. अशा रीतीने प्राध्यापक म्हणून कलकत्त्याच्या राममोहन कॉलेजमध्ये त्यांचा प्रवास सुरू झाला. त्यांची ज्या जागेवर नेमणूक करण्यात आली होती ती Leave Vacancy असल्यामुळे इतर ठिकाणांचा शोध सुरू झालेला असतांना मुर्शिदाबाद जिल्ह्यातील जांगीपूर कॉलेजमध्ये त्यांना अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली. जांगीपूर कॉलेजचे प्राचार्य हे केमिस्ट्री या विषयाचे शिक्षक होते. बेकायदेशीरपणे अनेक कामे करण्याबद्दल त्यांची ख्याती होती. शिक्षकांमध्ये तर तो चर्चेचा विषय होता. शासनाकडे आणि संबंधित वरिष्ठांकडे याबाबतची तक्रार करावी असा विचार शिक्षक वर्गामध्ये सुरू झाला, पण नेहमीप्रमाणे समोर येण्यास कोणीही तयार नव्हते. या सर्व घटनाक्रमाच्या शेवटी प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी हे काम हाती घ्यावे असा सर्व शिक्षक वर्गानी विचार केला आणि सर्व शिक्षक वर्गाच्या वतीने महाविद्यालयाच्या गर्व्हनिंग बॉडीवर शिक्षकांचे प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड करण्यात आली. त्यावेळेला शिक्षक म्हणून त्यांची सेवा एक वर्षाची झाली होती. ते सेवेत कायमसुद्धा झालेले नव्हते. त्यांचा प्रोबेशन काळ सुद्धा संपलेला नव्हता. महाविद्यालयाच्या एकंदर कारभाराची चौकशी करण्यात यावी याबाबतची निवेदने शिक्षण संचालकांना व शासनाला देण्याची जबाबदारी सर्व शिक्षक वर्गानी प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांच्यावर सोपविली. याच दरम्यानच्या काळात **"जांगीपूर कॉलेजमधून तुमची सेवा समाप्त करण्यात येत आहे" अशा अर्थाचे पत्र त्यांना प्राप्त झाले. त्यांचा प्रोबेशन काळ अजून पूर्ण झालेला नव्हता आणि त्यामुळे त्यांची सेवा समाप्त करण्याचा अधिकार व्यवस्थापनाला होता. त्यावर कोणतीही कायदेशीर उपाययोजना करणे शक्य नव्हते.** एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन देऊन सेवा समाप्त करता येईल अशी कायदेशीर व्यवस्था होती आणि सेवासमाप्तीच्या आदेशासोबत एक महिन्याचे वेतनसुद्धा महाविद्यालयाच्या व्यवस्थापकांनी पाठविले होते.

## *रामकृष्ण मिशन विद्यामंदिर महाविद्यालय, बेलूर मठ*

**७.** बेलूर मठ (कलकत्ता) येथील रामकृष्ण मिशन विद्यामंदिर महाविद्यालयामध्ये १९६५ मध्ये ते अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले व ३०-३५ वर्षांच्या सेवेनंतर त्याच महाविद्यालयातून ते सेवानिवृत्त झाले. हे अतिशय प्रसिद्ध व ख्यातकीर्त महाविद्यालय होते. प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांच्या संघटनात्मक कामाला त्या महाविद्यालयापासूनच खरी सुरुवात झाली.

**८.** सन १९६७ हे वर्ष भारतातील सार्वत्रिक निवडणुकांचे वर्ष होते. त्या वर्षामध्ये पक्षाच्या वतीने बेलूर मठ येथे असलेल्या इंडियन ॲल्युमिनिअम फॅक्टरीमध्ये ट्रेड युनिअन कॉंग्रेसच्या कार्यालयात मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्यांना देण्यात आली होती. लोकसभेच्या निवडणुकीसाठी कॉ. महम्मद इलीयास हे पक्षाचे उमेदवार होते व प्रा.मृण्मय भट्टाचार्य हे त्यांचे मुख्य प्रचारक होते. प्रचारासाठी बाली मुन्सिपल ग्राऊंडवर झालेल्या सभेचे ते अध्यक्ष होते. सभेचे मोठमोठे पोस्टर शहरात लागले होते आणि त्यावर सभेचे अध्यक्ष म्हणून प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांचे नाव होते.

**९.** महाविद्यालयाचे प्राचार्य स्वामी तेजसानंद यांनी त्या दोन-चार दिवसात प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांना आपल्या कार्यालयात बोलाविले व पोस्टरवर सभेचे अध्यक्ष म्हणून आपले नाव छापलेले आहे काय? अशी विचारणा केली असता प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी होकारार्थी उत्तर दिले. "राजकीय पक्षाच्या प्रचारामध्ये भाग घेण्यापासून आपण दूर रहावे" असा सल्ला प्राचार्यांनी त्यांना दिला असता "या देशाच्या घटनेने तसे करण्याचे मला स्वातंत्र्य दिलेले आहे त्यामुळे मी आपला सल्ला मान्य करू शकत नाही" असे प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी त्यांना नम्रपणे सांगितले. **त्यादिवसापासून प्राचार्य आणि प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांच्यातील संघर्ष सुरू झाला.** प्राचार्यांनी एक एका शिक्षकाला बोलावून याबाबतीत उपदेश केला.

**१०.** विद्यामंदिर महाविद्यालयामध्ये स्टाफ कौन्सिल किंवा टिचर्स कौन्सिलमध्ये निवडणुकीने निवडून आलेले सेक्रेटरीचे पद अस्तित्वात नव्हते. वर्षाच्या शेवटी व वर्षाच्या सुरुवातीला प्राचार्य हे स्वतः स्टाफ कौन्सिलची मिटिंग बोलावित असत. अशाच एका स्टाफ कौन्सिलच्या मिटिंगमध्ये "शिक्षकांनी कोणत्याही राजकीय कृतीमध्ये भाग घेता कामा नये" अशा प्रकारचा ठराव प्राचार्यांनी

## It is not an exaggeration to say that by his death university/ college teachers in the country lost their Godfather.

### B. VIJAY KUMAR,
### Former General Secretary, AIFUCTO & FISE

Very sad to know about the sudden demise of Prof. Mrinmoy Bhattacharjee at Kolkata on 21 st November 2023 He was 83. Though he was bedridden for almost three years and suffering from Parkinson's disease, we never expected this to happen so soon. **He was lifelong fighter. He was General Secretary of AIFUCTO for almost two decades ending in 1999. Uniform UGC scales through out the country, & time bound promotions to the college teachers was achieved during his leadership of AIFUCTO.** Earlier to that college teachers were recruited as Lecturers and retired as Lecturers. During his period of leadership AIFUCTO conducted two All India Strikes in 1987(32days )& 1998(26days).

Resulting in an agreement by MHRD to give time scale Pramotions to Lectures to Reader Scale & Professor scale with out insisting improvement of qualifications . We could get promotion to Professor scale only after the implementation of 2016 scales. **These strikes of 1987 & 1998 are the only National strikes conducted by white collared employees in the country.** As General Secretary of AIFUCTO he established good traditions of conducting periodic organizational meetings in time. Like National conferences every year, NEC meetings every 3 months. Electing office bearers every two years.

He has made AIFUCTO as a model of University/ College Teachers Union in the country. That is one of the reason we find many vice chancellors in the country who ere associated with AIFUCTO . **During his tenure he must have visited all the units of AIFUCTO from Kashmir to Kanyakumari & Gujarat to North East .** He started an organizational magazine Teachers' movement which was publishing Annual Report & Audited Report accounts of AIFUCTO. In addition to current news of events of higher education.

**In addition to excellent union leader he was also excellent teacher of Economics.** He retired as HOD of Economics from Ramkrishna Mission's (Residential )college at Belurmuth in the year 2000. Internationally Prof. Mrinmoy played a glorious role in International teachers union movement. In the world only FISE ( world federation of teachers unions) is a majority union of Higher Education teachers. Other international teachers unions represent only the interests of School Teachers. After the collapse of Soviet Union .

World Federation of trade unions planned to dismantle FISE and planned to merge with government employees unions. So at Budapest conference of WFTU, he moved a resolution to retain FISE arguing problems of teachers are different from the problems of civil servants . As no other teachers' union in developed world was ready to take up the leadership. Mrinmoy agreed to move the leadership to India and became the General Secretary of FISE in 2002. He attended many of UNESCO biannual conferences held at Paris and ILO conferences at Geneva involving teachers appointments and services conditions.

At one of the UNESCO conferences there was a move to make Higher Education as a Private goods from social goods. Intervention of FISE stopped this. He also encouraged teachers to attend these conferences to know about working of UNESCO /ILO / WHO/FAO . **It is not an exaggeration to say that by his death university/ college teachers in the country lost their Godfather.** Personally I have lost a good friend,guide and Philosopher.I convey my deep condolences to the bereaved family & friends.

मांडला. या ठरावाचे मुख्य लक्ष्य हे अर्थात प्रा.मृण्मय भट्टाचार्य हेच होते. स्टाफ कौन्सिल मध्ये या विषयावर चर्चा झाली. प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी त्या ठरावाला विरोध केला. पण एकाही शिक्षकाने याबाबतीत त्यांना साथ दिली नाही. याचे मुख्य कारण म्हणजे प्राचार्यांनी अगोदरच सर्वांशी बोलून त्यांना तयार केले होते.

**११.** सन १९६७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. अनेक राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाला आपली सत्ता गमवावी लागली. तशी ती पश्चिम बंगालमध्येसुद्धा गमवावी लागली. पश्चिम बंगालमध्ये संमिश्र सरकारचा जमाना सुरू झाला होता. सन १९६७ मध्ये युनाटेड फ्रंटचे सरकार अस्तित्वात आले. CPI सत्ता स्थापन करणाऱ्या पक्षांमध्ये एक पक्ष होता. CPI चे विश्वनाथ मुखर्जी, सोमनाथ लाहिरी व रेणू चक्रवर्ती असे तीन मंत्री हे मंत्रिमंडळात सहभागी होते. आता राज्यात अनुकूल शासन सत्तारूढ असल्यामुळे पक्षात असलेल्या आपल्या संपर्काचा वापर करून शिक्षकांच्या सेवाशर्ती मध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी सुरू केला. स्वाभाविकपणे या प्रयत्नांची सुरुवात ही त्यांनी त्यांच्या महाविद्यालयातूनच केली.

**१२.** महाविद्यालयांच्या पातळीवर मुख्यत्वे तीन मुद्दे महत्त्वाचे होते. **(i)** पहिला मुद्दा हा पहिल्या वेतन आयोगाच्या २००-५०० च्या वेतनश्रेणीमध्ये मूळ वेतन हे २०० रुपये होते व त्यावर महागाई भत्ता दिल्या जात असे. महागाई भत्त्यामध्ये सुद्धा दोन घटक असत. पहिला घटक म्हणजे Fixed Amount हा राज्यशासनातर्फे दिला जात असे. तो १७.५० रुपये दरमहा एवढा असे आणि दुसरा घटक म्हणजे Variable Component चा असे तो किमान १७.५० आणि कमाल १५० रुपये असा होता. हा भाग महाविद्यालयाने द्यायचा असे. या महाविद्यालयात दुसऱ्या घटकापोटी फक्त १७.५० रुपये दिले जात असत. त्याबाबत सर्व शिक्षकांची नाराजी होती. **(ii)** दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे इतर अनेक महाविद्यालयात स्टाफ कौन्सिल अस्तित्वात होते. प्राचार्य त्याचे अध्यक्ष राहत आणि सचिव हे शिक्षकांनी निवडलेले असत. पण विद्यामंदिर महाविद्यालयामध्ये अशा प्रकारची व्यवस्था अस्तित्वात नव्हती. **(iii)** तिसरा मुद्दा म्हणजे महाविद्यालयाचे संचालन करणाऱ्या शिक्षा परिषदेमध्ये पूर्ण वेळ काम करणारे शिक्षकांनी निवडून दिलेले दोन शिक्षक प्रतिनिधी पाठविण्याचा नियम या महाविद्यालयात अंमलात नव्हता.

**१३.** या तीनही मागण्यांबाबत प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी आपल्या शिक्षक सहकाऱ्यांशी चर्चा करून त्यांचे मत या मागण्यांना अनुकूल करून घेतले. इतकेच नव्हे तर त्याबाबतचे एक निवेदन तयार केले व सर्व शिक्षकांच्या सह्यानिशी हे निवेदन संस्थेला सादर केले. प्राचार्यांनी स्टाफ कौन्सिलची मिटिंग घेतली व सर्व शिक्षकांना याबाबत त्यांचे काय मत आहे? हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. सर्व शिक्षकांनी निवेदनावर आपण सही केली असून निवेदनातील मागण्यांवर आपण ठाम असल्याचे प्राचार्यांना सांगितले. प्राचार्यांसाठी तो एक मोठा धक्का होता. प्राचार्य स्वामी तेजसानंद यांनी त्या बैठकीत असे सांगितले की, आपण या मागण्या मान्य करू शकत नाही. पुढे हा संघर्ष बराच वाढत गेला. **एका पिरियड वर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन झाले व ते यशस्वीपणे पार पडले. त्यानंतर धरणे आंदोलन सुरू झाले, तेव्हा मात्र प्राचार्यांनी चर्चा करून यातून काही मार्ग काढला पाहिजे असे शब्द वापरायला सुरुवात केली.** मात्र प्राचार्य स्वामी तेजसानंद यांचा हा प्रस्ताव संस्थेचे सचिव स्वामी अब्जानंद यांना मान्य झाला नाही. त्यामुळे काही चर्चा होऊ शकली नाही.

**१४.** संस्थेचे सचिव स्वामी अब्जानंद यांनी अतिशय प्रतिकूल भूमिका घेतली. प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांच्या नेतृत्त्वाखाली शिक्षकांनी या आंदोलनात भाग घेतला. या आंदोलनाला विद्यार्थी वर्गाने फार मोठा पाठिंबा दिला. दरम्यानच्या काळात स्वामी अब्जानंद यांच्या पुढाकाराने आंदोलनाच्या या भूमिकेबद्दल **"शैक्षणिक शिस्तीचा भंग केल्याबद्दल तुमच्या दोन वेतनवाढी रोखल्या जाऊ शकतात"** अशा प्रकारची नोटीस सर्व शिक्षकांवर बजावण्यात आली. चुकीचे निवेदन सादर केल्याच्या अयोग्य वर्तनाबद्दल मृण्मय यांच्यावर एक वेगळी नोटीस बजावण्यात आली. पश्चिम बंगाल शिक्षक संघटनेच्या वतीने पाठविण्यात आलेल्या एका चमूमध्ये आयफक्टोने दिल्ली येथे आयोजित केलेल्या निदर्शनासाठी जातांना वैद्यकीय कारणासाठी रजा घेतल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. दिल्ली येथे जाणाऱ्या ट्रेनच्या प्रवाशांची यादी सोबत जोडली होती. प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी वैद्यकीय कारणासाठी रजा घेतली होती तर मग त्यांनी प्रवास कसा केला? अशा प्रकारचे आरोपाचे स्वरूप होते. **"प्रत्यक्षात प्रवास करायचा की नाही हे ठरविणे डॉक्टरांचे काम आहे, त्यासाठी व्यवस्थापनाचे मत हे ग्राह्य धरून चालणार नाही."** अशा प्रकारचा खुलासा मृण्मय यांनी व्यवस्थापनाकडे पाठविला. पण व्यवस्थापन ही गोष्ट मान्य करायला तयार नव्हते.

**१५.** शेवटी याबाबतीत न्यायालयात जाण्याच्या मार्गाचा वापर करण्यात आला. प्रा.माधव मित्रा या तत्वज्ञान विभागातील प्राध्यापकांचे वडील वकील होते. सर्व शिक्षक त्यांच्याकडे गेले व त्यांनी नामवंत विधिज्ञ अपूर्वधन मुखोपाध्याय यांची मदत घेण्याचा सल्ला दिला. ॲड. मुखोपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आली. **हावडा कोर्टाने प्रा.मृण्मय यांच्या बाजूने निर्णय दिला.** मात्र या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाच्या वतीने स्वामी अब्जानंद यांनी **"आमच्या मताप्रमाणे आम्हाला महाविद्यालय चालविता येणार नसेल तर आम्ही महाविद्यालय बंद करू" अशी भूमिका जाहीरपणे मांडली.**

**१६.** व्यवस्थापकांच्या उपरोक्त भूमिकेमुळे सर्वत्र खळबळ माजली. रामकृष्ण मिशन विद्यामंदिर हे विद्यापीठाचे संलग्न महाविद्यालय होते. कलकत्ता विद्यापीठाने राज्यस्तरीय महाविद्यालयीन शिक्षकांच्या संघटनेचे (WBCUTA) महासचिव श्री.अमेय दासगुप्ता यांनी या प्रकरणी विद्यापीठाच्या वतीने मध्यस्थ म्हणून लक्ष घालावे असा निर्णय घेतला. याचा फायदा असा झाला की, शिक्षकांच्या तीनही मागण्या समाधानकारकपणे मार्गी लागल्या. **(i)** टिचर्स कौन्सिलचे सेक्रेटरी निवडण्याचा अधिकार मान्य झाला. **(ii)** व्यवस्थापकांनी शिक्षकांच्या महागाई भत्त्यामध्ये रुपये १७.५० वरून ५० रुपये वाढ करण्याचे मान्य केले आणि **(iii)** व्यवस्थापन मंडळावर टिचर्स कौन्सिलचे दोन प्रतिनिधी निवडण्याचा अधिकारसुद्धा मान्य करण्यात आला. ह्या सर्व बाबी एक वर्षानंतर लागू होतील असेही ठरले. व्यवस्थापनाने सर्व चौकशा थांबविण्याचे व शिक्षकांनी न्यायालयीन प्रकरणे मागे घेण्याचे मान्य केले. **सर्व दारे जेव्हा बंद होतात तेव्हा कुठे तरी एखादी खिडकी उघडलेली असते. तेव्हा कोणताही प्रश्न अधांतरी सोडू नका ! मध्येच गलितगात्र होऊ नका ! (A window opens up when all doors have closed : Never Give Up) हा या प्रकरणातून त्यांना मिळालेला धडा त्यांनी आयुष्यभर लक्षात ठेवला.**

**१७.** या सर्व प्रकरणाचा एकूणच गाजावाजा इतका झाला की, या दरम्यान प्राचार्य स्वामी तेजसानंद यांच्या जागी स्वामी प्रभानंद यांची प्राचार्य म्हणून नेमणूक झाली. त्याच बरोबर रामकृष्ण मिशनने संस्थेचे सचिव स्वामी अब्जानंद यांची बदली केली. या सर्वांचा परिणाम असा झाला की, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे नेते म्हणून प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांना व्यापक मान्यता मिळाली. WBCUTA या राज्यस्तरीय संघटनेच्या कार्यकारी मंडळामध्ये सदस्य म्हणून त्यांची निवड झाली.

**१८.** प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांच्या महाविद्यालयीन जीवनातील सुरुवातीच्या काळातील चळवळीची मी मुद्दामच तपशीलवार माहिती वर दिलेली आहे. शिक्षक चळवळीचे नेतृत्त्व करणारांच्या महाविद्यालयीन जीवनामध्येच अन्यायाचा प्रतिकार करण्याची बीजे रोवली जातात. ती सुरुवात असते. विद्यामंदिर महाविद्यालयातील चळवळीमुळे त्यांना शिक्षक चळवळीचे नेते म्हणून मान्यता प्राप्त झाली होती. त्यांच्या महाविद्यालयाचे बदललेले प्राचार्य स्वामी प्रभानंद व त्यानंतरचे प्राचार्य स्वामी शिवमयानंद यांच्याशी त्यांचे पुढच्या काळामध्ये सौहार्दाचे संबंध राहिले. शिक्षक या नात्याने आपले काम उत्तमरीतीने पार पाडायचे. विशेषतः संघटनेच्या कामामुळे प्रभावित झालेले कामाचे तास भरून काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचे जादा वर्ग घ्यायचे यामुळे ते विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा प्रिय होते. अशातच त्यांची सन १९६९ मध्ये पश्चिम बंगाल महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक संघटनेचे (WBCUTA) महासचिव (General Secretary) म्हणून निवड झाली.

**१९.** या राज्यस्तरीय संघटनेमध्ये प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी केलेल्या कामाचे तपशील नमूद करण्याचे मी विस्तारभयास्तव टाळत आहे. पुढच्या १०-११ वर्षात या शिक्षक संघटनेचे महासचिव, उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष या पदावरून त्यांनी काम केले. इतर साऱ्या बाबींचे तपशील टाळणे शक्य असले तरी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. सन १९७१ मध्ये त्यावेळेच्या पूर्व पाकिस्तानात (म्हणजे आजचा बंगलादेश) शेख मुजीबूर रहमान यांच्या

**सर्व दारे जेव्हा बंद होतात तेव्हा कुठे तरी एखादी खिडकी उघडलेली असते. तेव्हा कोणताही प्रश्न अधांतरी सोडू नका ! मध्येच गलितगात्र होऊ नका !**

*( परिच्छेद १६ पहा )*

नेतृत्त्वाखाली एक फार मोठा संघर्ष सुरू झाला होता. पाकिस्तान सरकारने मोठ्या दडपशाहीचे धोरण सुरू केले होते. सुरुवातीला लेफ्टनंट जनरल टिक्का खान व त्यानंतर लेफ्टनंट जनरल अे.अे.के.नियाझी यांच्या नेतृत्त्वाखाली फार मोठी लष्करी दडपशाही त्या भागात सुरू झालेली होती. शेकडो लोक घरेदारे सोडून परागंदा झाले होते. भारतात तर अशा हजारो लोकांनी प्रवेश मिळविला होता. शेख मुजीबूर रहमान यांच्या नेतृत्त्वाखालील या चळवळीला भारतामध्ये फार मोठा पाठिंबा व्यक्त केल्या जात होता. **पश्चिम बंगाल महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक संघटना (WBCUTA) व अखिल भारतीय प्राध्यापक संघटना यांनी या कामामध्ये बंगलादेशातील चळवळीला मोठ्या प्रमाणात मदत करण्याचा निर्णय घेतला होता. यामध्ये प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांची फार मोठी भूमिका होती.**

२०. प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांच्या पुढाकाराने बंगला देशातील काही विचारवंतांनी भारतामध्ये येऊन तेथील परिस्थिती विशद करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. पश्चिम बंगालमध्ये अशा अनेक सभांचे आयोजन करण्यात आले. मध्यप्रदेश महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक संघटनेचे नेते व प्रा.मृण्मय यांचे मित्र प्रा.एल.एम.पालीवाल यांच्या सहकार्याने अशा विचारवंतांच्या सभा जबलपूर, सागर, भोपाळ, इंदौर व रायपूर या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या. सन १९७१ च्या डिसेंबर महिन्यात पाकिस्तानी लष्कराला शरणागती पत्करावी लागली व स्वतंत्र बंगलादेशाची निर्मिती झाली. शेख मुजीबूर रहमान हे बंगलादेशाचे अध्यक्ष झाले हा इतिहास सर्वांना ठाऊक आहे.

२१. बंगला देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या भारतीय नागरिकांनी सहाय्य केले त्यांचा पुढे बंगलादेश प्रजासत्ताक गणराज्याच्या शासनाने पुरस्कार (Awards Bestowed by Government of People's Republic of Bangladesh to Indian nationals) देऊन सन्मान केला. पहिला सर्वश्रेष्ठ पुरस्कार म्हणजे "स्वाधिनता सन्मान (Swadhinata Samman) पुरस्कार" असून तो श्रीमती इंदिरा गांधी यांना प्रदान करण्यात आला. दुसरा पुरस्कार "बंगलादेश स्वातंत्र्ययुद्ध सन्मान (Bangladesh Liberation War Honour) पुरस्कार." हा पुरस्कार श्री.प्रणव मुखर्जी व श्री.फ़करुद्दीन अली अहमद या दोन माजी राष्ट्रपतींना व श्री.इंद्रकुमार गुजराल तसेच श्री.गुलझारीलाल नंदा या दोन माजी पंतप्रधानांना प्रदान करण्यात आला. तिसरा पुरस्कार "बंगलादेश स्वातंत्र्य समराचे मित्र (Friends of Liberation War Honour) पुरस्कार" म्हणून प्रदान करण्यात आला. हा तिसरा पुरस्कार लेखक, कवी, पोलीस अधिकारी, लष्करातील अधिकारी, पत्रकार, साहित्यिक, राजकारणी नेते, माजी मंत्री व मुख्यमंत्री असा अनेकांना प्रदान करण्यात आला. दिनांक २४ मार्च २०१३ रोजी ज्यांना असा पुरस्कार देण्यात आला त्यांच्या यादीमध्ये (List of Recipients of Friends of Liberation War Honour on 24.03.2013) पहिल्या क्रमांकावर श्री. हिरण्यकुमार भट्टाचार्य (Former Police Officer and Trainer of Mukti Bahini, India) यांचे नाव असून दुसऱ्या क्रमांकावर प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांचे नाव आहे. दिनांक २४ मार्च २०१३ रोजी बंगलादेशाचे मा.राष्ट्रपती व पंतप्रधान यांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांना गौरवचिन्ह प्रदान करण्यात आले. त्याच भेटीत ढाका विद्यापीठाच्या जगन्नाथ सभागृहामध्ये शिक्षक संघटनांनी प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांचा जाहीर सत्कार केला. प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांना सन्मानपूर्वक बंगलादेश सरकारने शाही पाहुणे (State Guest) म्हणून निमंत्रित केले होते.

## *अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे महासचिव*

२२. महाविद्यालयीन शिक्षक चळवळीचे राष्ट्रीय स्तरावरील एक ज्येष्ठ नेते व अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे तत्कालीन महासचिव प्रा.अमेय दासगुप्ता यांचे दिनांक २८ मार्च १९८० रोजी अनपेक्षितपणे दुःखद निधन झाले. अनेक ज्येष्ठ नेते स्पर्धेमध्ये असतांना सुरुवातीला राष्ट्रीय कार्यकारी मंडळाने व त्यानंतर त्याच वर्षी पाटणा येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेने (National Conference of AIFUCTO) एकमताने प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांची महासचिव पदावर निवड केली. निरनिराळ्या पदांवरून महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारी मंडळामध्ये ते अनेक दिवसांपासून कार्यरत होते. त्यामुळे देशातील विविध राज्याच्या संघटनेच्या नेत्यांशी त्याचा जवळून परिचय होता. आकर्षक व प्रभावी व्यक्तिमत्त्व त्याबरोबरच अस्खलित इंग्रजीत उत्तम वक्तृत्वाची जोड त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला लाभलेली होती. आपला मुद्दा मांडतांना 'बोंगाली' वळणाच्या इंग्रजीतून त्यांनी एकदा भाषण सुरू केले म्हणजे त्यांच्या भाषणातील गोडवा व माधुर्य श्रोत्यांवर प्रभाव पाडून जात असे. चर्चा व संवाद यातून मार्ग काढण्यावर दृढ विश्वास, आपले मत ठामपणे मांडत असतांना विरोधकांचे विचारसुद्धा लक्षपूर्वक ऐकण्याची त्यांची वृत्ती व विरोधकांच्या मत प्रतिपादनामध्ये काही तथ्य आढळल्यास आपल्या मताला त्याप्रमाणे मुरड घालण्याची सदैव तयारी या त्यांच्या गुणवैशिष्ट्यांनी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ सदैव लाभान्वित झाल्याचे मी पाहिले आहे.

२३. प्रा.मृण्मय स्वतः कम्युनिस्ट (I) पक्षात होते व शेवटपर्यंत ती बांधिलकी त्यांनी कायम ठेवली. संघटनेच्या कामामध्ये मात्र पक्षीय विचारसरणीला स्थान देता कामा नये हा त्यांचा ठाम दृष्टिकोन हेसुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक फार मोठे वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. माझ्या निरीक्षणाप्रमाणे त्यावेळेला राष्ट्रीय कार्यकारिणी मध्ये तीन प्रमुख गट होते. पहिला गट म्हणजे CPI (M) च्या नेतृत्त्वाशी बांधिलकी असलेल्या नेत्यांचा होता. दुसरा गट हा CPI (I) च्या नेतृत्त्वाखाली कार्यरत होता व तिसरा गट काँग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष व जनसंघ या पक्षांशी बांधिलकी असलेल्या नेत्यांचा होता. अपक्षांचा सुद्धा याच तिसऱ्या गटात समावेश होता. या तीनही गटातील नेत्यांचे विचार ऐकून वैचारिक समतोल साधण्याची जी किमया प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांना साधली होती ती एक विशेष गोष्ट म्हणावी लागेल. **त्यामुळेच राजकीय विचारसरणी नुसार एखाद्या विषयाला विरोध करणे किंवा पाठिंबा देणे हा प्रकार अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या व्यवस्थेमध्ये अजिबात आढळून येत नव्हता. तेच धोरण देशभर खालपर्यंत पाझरत गेले.**

२४. एकदा अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या महासचिव पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ही देशव्यापी संघटना आहे. शिक्षकांना भेडसावणाऱ्या विपरित स्थितीला संपुष्टात आणण्यासाठी पुढाकार घेणे हे आपले मुख्य काम आहे. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यवसायाला उचित मान व सुसह्य व्यावसायिक स्थिती मिळवून देणे ही आपली मुख्य जबाबदारी आहे, या दृढ भावनेने त्यांनी देशभर संघटनेच्या बांधणीला सुरुवात केली. महासंघाचे महासचिव होण्यापूर्वी ७ वर्षे ते सातत्याने या महासंघाचे सहसचिव होते. त्यापूर्वीसुद्धा अनेक वर्षे ते राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये या ना त्या स्वरूपात कार्यरत असल्यामुळे त्यांची देशभरातील शिक्षक संघटनांच्या नेत्यांशी जवळून ओळख होती. कोणकोणत्या घटक संघटना मजबूत आहेत व कोठे मेहनत करण्याची गरज आहे याचे मजबूत आराखडे त्यांनी तयार केले व त्याप्रमाणे प्रचंड वेगाने कामाला सुरुवात केली. एक मजबूत व लढाऊ संघटन म्हणून महासंघाची बांधणी करण्यासाठी त्या काळामध्ये त्यांनी केलेल्या सर्व धडपडीचा आढावा घेणे शक्य नसले तरी त्या धडपडीची निश्चित कल्पना येऊ शकेल अशी काही मोजकी उदाहरणे नमूद करणे मला आवश्यक वाटते.

२५. **आसाम महाविद्यालयीन शिक्षक संघटना :** अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या स्थापनेमध्ये व त्यानंतरच्या प्रवासामध्ये पुढाकार घेणारी आसाम महाविद्यालयीन शिक्षक संघटना (Assam College Teachers' Association - ACTA) ही एक महत्त्वपूर्ण घटक संघटना होती. पण गेल्या दोन-चार वर्षांपासून या संघटनेने संलग्नता शुल्क सुद्धा भरलेले नाही व त्या संघटनेचे प्रतिनिधी बैठकांनासुद्धा हजर राहत नाहीत ही गोष्ट प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांच्या लक्षात आली.

**(i)** आसाम महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे एक नेते प्रा.बिरेन तालुकदार हे प्रा.मृण्मय यांचे मित्र होते व त्या संघटनेचे जनरल सेक्रेटरी म्हणून त्यांची अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या दप्तरी नोंद होती. आसाम पासून आपल्या कामाला सुरुवात करावी असा विचार पक्का करून प्रा.मृण्मय भट्टाचार्य हे रेल्वेने गोहत्ती येथे पोहचले. संघटनेच्या कार्यालयाचा जो पत्ता आपल्या दप्तरात आहे तो बरोबर आहे की नाही व ते कार्यालय जागेवर आहे की नाही याची त्यांना माहिती नव्हती. त्या पत्त्यावर जेव्हा ते पोहचले तेव्हा दोन खोल्यांच्या एका कौलारू इमारतीच्या बाहेर Assam College Teachers' Association - ACTA अशी पाटी लावलेली त्यांना आढळून आली. बऱ्याच दिवसांपासून ते कार्यालय कार्यरत नाही हे त्यांच्या लक्षात आले. त्या कार्यालयाची व्यवस्था

**An extraordinary story of how a window opens up when all doors have closed**

( परिच्छेद ४० पहा )

पाहणाऱ्या एका कर्मचाऱ्याने प्रा.बिरेन तालुकदार हे सध्या शिलाँग येथे काम करतात असे सांगितले.

**(ii)** वेळ न घालवता प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी शिलाँग येथे जाण्याचा निर्णय घेतला. भागिदारी टॅक्सीने प्रा.मृण्मय शिलाँग येथे पोहचले. सेंट अँथोनी कॉलेजमध्ये प्रा.बिरेन हे काम करतात अशी त्यांना माहिती मिळालेली होती. त्या कॉलेजमध्ये ते जाऊन पोहचले. कॉलेजमध्ये काही प्राध्यापकांनी त्यांना ओळखले व माहिती अशी दिली की, प्रा.बिरेन हे सध्या रजेवर असून ते दिनाहट्टा-नागाँव या त्यांच्या गावी गेलेले आहेत.

**(iii)** लगेच बसने ते दिनाहट्टा-नागाँव येथे प्रा.बिरेन यांच्या निवासस्थानी पोहचले पण नेमके प्रा.बिरेन हे घरी नव्हते. नावावरून कुटुंबातील व्यक्तींनी त्यांना ओळखले. चहापान झाले व प्रा.मृण्मय त्यांची वाट पहात बसले. रात्री नऊ वाजता प्रा.बिरेन हे घरी आले तेव्हा अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे महासचिव आपल्या घरी आपली वाट पहात बसलेले आहेत हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. सर्व स्थितीची कल्पना आल्यावर दोघेही नागाँव कॉलेजचे प्राचार्य श्री.मोहीलधर सैकिया (जे सध्या ACTA चे अध्यक्ष होते) यांच्या निवासस्थानी पोहचले. तपशीलवार चर्चा झाली. **सैकिया यांनी प्रा.मृण्मय यांची तळमळ लक्षात घेऊन संपूर्ण सहकार्य करण्याचे मान्य केले. त्या दिवसापासून ACTA ही चांगलीच कार्यरत झाली.**

**२६. आंध्रप्रदेश शासकीय महाविद्यालयीन शिक्षक संघटना :** जी परिस्थिती आसाममध्ये होती त्याच प्रकारची परिस्थिती वेगळ्या कारणाने आंध्रप्रदेशामध्ये होती. आंध्रप्रदेश शासकीय महाविद्यालय शिक्षक संघटनेचे (Andhra Pradesh Government College Teachers' Association - APGCTA) प्रतिनिधी महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये अनेक दिवसांपासून सहभागी होत नाहीत. इतकेच नव्हे तर त्यांनी संलग्नता शुल्क सुद्धा भरलेले नाही ही गोष्ट प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांच्या लक्षात आली. त्याची कारणे जाणून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला असता असे लक्षात आले की, त्या संघटनेच्या एका निवडणुकीमध्ये सर्वच्या सर्व जुने पदाधिकारी पराभूत झाले व सर्वच्या सर्व तरुण असे नवीन नेते निवडून आले. जुन्या पदाधिकाऱ्यांनी नव्या पदाधिकाऱ्यांना कोणतीही कागदपत्रे सुपूर्त केली नाहीत. पदभार हस्तांतरीत केला नाही. ही स्थिती लक्षात आल्यानंतर संघटनेतील आपले एक सहकारी प्रा.अमुल्य भट्टाचार्य यांना सोबत घेऊन प्रा.मृण्मय यांनी हैद्राबाद गाठले. हैद्राबादला आल्यानंतर नव्याने निवडून आलेले संघटनेचे जनरल सेक्रेटरी प्रा.जयशंकर यांच्याशी त्यांनी संपर्क साधला. नव्याने निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक बोलाविण्यात आली. **दोन दिवस हैद्राबाद येथे मुक्कामी राहून व जुन्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून नवीन कार्यकारी मंडळाचे काम प्रा.मृण्मय यांनी मार्गी लावले व तेव्हापासून या संघटनेचा अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या कामकाजातील सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला.**

**२७. तामिळनाडू शासकीय महाविद्यालयीन शिक्षक संघटना :** तामिळनाडू शासकीय महाविद्यालयीन शिक्षक संघटना (TamilNadu Goverment Collegiate Teachers' Association - TNGCTA) या संघटनेच्या संदर्भात सुद्धा एका महत्त्वपूर्ण घटनेचा उल्लेख करणे आवश्यक आहे. ही संघटना महासंघाच्या कामामध्ये सुरुवातीपासून सहभागी होती. पण त्या संघटनेत आणखी चैतन्य ओतण्यासाठी प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी वापरलेल्या मार्गाविषयीची ही बाब आहे.

**(i)** अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठका तसेच राष्ट्रीय परिषदेच्या बैठका ह्या देशातील दिल्ली, कलकत्ता यांसारख्या शहरांमध्ये होत असत. या बैठका देशातील वेगवेगळ्या राज्यातील शहरांमध्ये सुद्धा व्हाव्यात असे प्रा.मृण्मय यांना वाटत असे. आता ते महासचिव झाल्यामुळे हे धोरण प्रत्यक्ष अंमलात आणण्याची संधी त्यांना उपलब्ध झालेली होती. त्या संधीचा वापर अगदी पहिल्या दिवसापासून त्यांनी सुरू केला.

**(ii)** पूर्व महासचिवांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या महासचिव पदावर दिनांक २७ एप्रिल १९८० रोजी दिल्ली येथे जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या परिसरात झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या तातडीच्या बैठकीत प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांची महासचिवपदी निवड झाली होती व त्यानंतर त्याच वर्षी पाटणा येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये (National Conference) त्यांची महासचिव म्हणून नियमित निवड झाली. या पाटणा येथील परिषदेमध्ये तामिळनाडू संघटनेचे अध्यक्ष प्रा.सी.सुब्रमण्यम हे उपस्थित होते. प्रा.सी.सुब्रमण्यम हे त्यावेळेला ऊटी येथे शासकीय महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून काम करीत होते. प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी त्यांच्याशी चर्चा करतांना "राष्ट्रीय कार्यकारिणीची (NEC) बैठक व राष्ट्रीय चर्चासत्र आपल्याला ऊटी येथे घेता येईल काय?" अशी विचारणा त्यांना केली. शक्य असल्यास आपल्याला ते आज जाहीर करता येईल, असेही मत व्यक्त केले. प्रा.मृण्मय यांच्या विचारणेला प्रा.सुब्रमण्यम यांनी तिथल्या तिथे असे उत्तर दिले की, "तुम्हाला इथेच जाहीर करावयाचे असेल तर केंद्रीय संघटनेकडून पाच हजार रुपये मला कर्जाऊ म्हणून तुम्हाला द्यावे लागतील." त्यावेळेला केंद्रीय संघटनेची आर्थिक परिस्थिती ही फार काही चांगली नव्हती. तरीही पाटणा सोडण्याच्या पूर्वी मी तशी व्यवस्था करून देतो असे प्रा.मृण्मय यांनी प्रा.सुब्रमण्यम यांना सांगितले. त्यावर प्रा.सुब्रमण्यम यांनी "ही रक्कम मी शक्य तेवढ्या लवकर तुम्हाला परत करेल" असे सांगितले व पुढे त्याप्रमाणे ती रक्कम परत केली. राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक व त्याला लागून National Integration या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र असा कार्यक्रम ऊटी येथे आयोजित करण्यात आला.

**(iii)** या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन तामिळनाडूचे मुख्यमंत्री श्री.एम.जी.रामचंद्रन यांनी केले. सेमिनार संपल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रीय ख्यातीच्या नर्तिका डॉ.पद्मा सुब्रमण्यम यांचा भरत नाट्यम नृत्याचा कार्यक्रम या सांस्कृतिक कार्यक्रमाचा मुख्य भाग होता. अगोदरच कार्यरत असलेल्या तामिळनाडूच्या घटक संघटनेमध्ये या आयोजनामुळे नवा जोश व उत्साह पहायला मिळाला. प्रा.सुब्रमण्यम हे प्रा.मृण्मय यांचे निकटचे व विश्वासू सहकारी म्हणून पुढच्या काळामध्ये कार्यरत राहीले. तामिळनाडूची घटक संघटनासुद्धा पुढे खुपच जोमाने कार्यरत होती. **प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी देशभरातील घटक संघटनांचे जे नेते सहकारी व मित्र म्हणून जोडले त्यातून अखिल भारतीय प्राध्यापक महासंघात देशभर नेतृत्त्वाची एक मजबूत साखळी उभी राहिली.**

**२८. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ** (Nagpur University Teachers' Association - NUTA) : पायाला भिंगरी लावल्याप्रमाणे आमचा हा नेता देशभर फिरत होता. झोपलेल्या घटक संघटनेला जागे करणे, जागे असलेल्या घटक संघटनेला उभे करणे, उभ्या असलेल्या घटक संघटनेला चालायला लावणे, चालत असलेल्या घटक संघटनेला धावायला लावणे, असा हा कार्यक्रम पुढच्या पाच-सात वर्षांत धडाकेबाज रितीने प्रा.मृण्मय यांनी अंमलात आणला. सन १९८७ च्या अखिल भारतीय कामबंद आंदोलनाची मजबूत बांधणी त्यांच्या या धडपडीतून केली गेली. **याच धडपडीच्या नकाशावर नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ (NUTA) कसा आला? याची माहिती मी नमूद करीत आहे.**

**(i)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ (MFUCTO) व या महासंघाच्या घटक संघटनांच्या कामकाजाची खडान्‌खडा माहिती प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांना होती. आणीबाणीच्या काळामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने व त्याच्या घटक संघटनांनी किती प्रखरपणे शिक्षकांवरील अन्यायाचा मुकाबला केला तोही त्यांना ठाऊक होता. 'नुटा'विषयी सुद्धा त्यांना तपशीलवार माहिती होती. दुसऱ्या वेतन आयोगाच्या वेळी नागपूर येथे पदवीदान समारंभावर बहिष्कार घालण्याचा जो कार्यक्रम नुटाने आयोजित केला होता त्याची त्यावेळेला देशभर चर्चा झालेली होती. शंभर टक्के वेतन अनुदानासह शासननियंत्रित वेतन वितरण व्यवस्थेची स्थापना करण्यासाठी सप्टेंबर १९७७ मध्ये नुटाने जे जबरदस्त कामबंद आंदोलन केले त्याचीही प्रा.मृण्मय यांना पुरेशी जाणीव होती.

**(ii)** सन १९८१ च्या ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रा.मृण्मय यांचा मला फोन आला. "नुटा बुलेटीनचे कायम वर्गणीदार किती आहेत? तुम्ही कायम वर्गणी किती ठेवली आहे?" याबाबत त्यांनी चौकशी केली. "संघटनेचे सदस्य असलेल्या प्रत्येक सभासदांकडे आम्ही 'नुटा बुलेटीन' विनामूल्य पाठवितो. सभासद नसलेल्या व्यक्तीला, संस्थेला किंवा ग्रंथालयाला आजीवन सदस्यता शुल्का इतका निधी भरून कायम वर्गणीदार होता येते" असे मी त्यांना सांगितले. "अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे मुखपत्र म्हणून "Teachers Movement" या त्रैमासिक नियतकालिकाचा पहिला अंक ऑगस्ट १९८० मध्ये प्रकाशित झाला असून जवळ जवळ गेले एक वर्षभर ते नियमितपणे प्रसिद्ध होत आहे.

***राजकीय विचारसरणी नुसार एखाद्या विषयाला विरोध करणे किंवा पाठिंबा देणे हा प्रकार AIFUCTO च्या व्यवस्थेमध्ये अजिबात आढळून येत नव्हता. तेच धोरण देशभर खालपर्यंत पाझरत गेले.***

( परिच्छेद २३ पहा )

तत्कामी लागणारे आर्थिक पाठबळ उभे करण्यास्तव देशभर त्याचे कायम वर्गणीदार नोंदविण्यासाठी आपण एक मोहीम हाती घेतली असून नुटाच्या कार्यकारी मंडळाशी त्याबाबत चर्चा करण्याची व त्यांच्यामार्फत अनेक शिक्षकांना कायम वर्गणीदार म्हणून नोंदणी करण्यास्तव विनंती करावी म्हणून नुटाच्या कार्यकारिणीच्या बैठकीला उपस्थित राहून संबोधित करावे असा माझा विचार आहे" असे प्रा.मृण्मय यांनी सांगितले. "आपण अवश्य या, आमच्यासाठी ही आनंदाची बाब आहे. आपल्याला सोयीची असेल त्या तारखेला अशी बैठक बोलाविण्यात येईल" असे मी त्यांना सांगितले. बैठकीच्या तारखेविषयी चर्चा झाली व शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट १९८१ ही बैठकीची तारीख ठरली.

**(iii)** अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या मुखपत्राविषयी प्रा.मृण्मय यांच्याशी बोलणे झाल्यामुळे नुटाचे मुखपत्र असलेल्या 'नुटा बुलेटीन'च्या बाबतीत जी धावपळ आम्हाला करावी लागली त्याची मला त्या निमित्ताने आठवण झाली. संघटनेचा विचार शिक्षकांपर्यंत जाऊन पोहचविण्यासाठी संघटनेचे एक मुखपत्र आवश्यक आहे, अशा प्रकारची भावना आम्हा लोकांच्या मनामध्ये निर्माण झालेली होती. त्यातून १९७६ साली चक्रमुद्रित स्वरूपात नुटा बुलेटीन सुरू करण्यात आले व दिनांक १५ ऑगस्ट १९७७ पासून ते मुद्रित स्वरूपात प्रकाशित व्हायला लागले. त्यावेळेला 'नुटा'च्या वार्षिक सदस्यत्वाची तरतूद घटनादुरुस्तीने काढून टाकण्यात आली. 'आजीवन सदस्य' एवढी एकच सदस्य व्यवस्था नुटाच्या घटनेमध्ये उपलब्ध होती.

**(iv)** आजीवन सदस्य नोंदविण्यासाठी नुटाच्या वतीने आम्ही पदाधिकाऱ्यांनी एक मोठी मोहीम त्या काळात राबविली होती. साधारणपणे रविवार या दिवशी पाच-सहा तालुक्याच्या ठिकाणी आम्ही तालुकानिहाय बैठका या कामासाठी आयोजित करीत होतो. सन १९७६ मध्ये एका रविवारी आमच्या दौऱ्यामध्ये पहिली सभा धामणगाव रेल्वे येथे सकाळी ७.३० वाजता होती. या दौऱ्यामध्ये मी स्वतः, प्रा.डॉ.शरद कळणावत, प्रा.अरविंद बारहाते, प्रा.श्रीधर चिंचमलातपूरे असे आम्ही पदाधिकारी सहभागी होतो. सभा वेळेवर सुरू होईल याची खात्री असल्यामुळे बहुतेक प्राध्यापक उपस्थित होते. "आजीवन सदस्यत्व व त्यामुळे नुटा बुलेटीनची विनामूल्य घरपोच सेवा" यासंबंधी आम्ही सभेत माहिती सांगितली. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.आर.आर.कुळकर्णी हे स्वतः सभेला उपस्थित होते.

**(v)** नागपूर विद्यापीठाच्या कोर्टावर त्यावेळच्या कायद्याप्रमाणे सर्व प्राचार्य हे पदसिद्ध सभासद असत. मी स्वतः त्यावेळेला कोर्टावर शिक्षक सदस्य म्हणून १९६९ मध्ये निवडून गेलो होतो. आमची भाषणे आटोपल्यावर प्राचार्य कुळकर्णी यांनी सभेत भाषण केले. महाविद्यालयीन शिक्षक आणि प्राध्यापकांवर नवीन कॉलेज कोडचे आलेले महासंकट परतवून लावण्यासाठी नुटाच्या मंडळींनी किती प्रयत्न केलेत याची तपशीलवार माहिती त्यांनी सभेला दिली. मी त्यावेळेला लिहिलेल्या "कॉलेज कोड नव्याने येऊ घातलेले" या पुस्तिकेचा त्यांनी उल्लेख केला. एवढे सारे बोलणे झाल्यावर सभेला उपस्थित असलेल्या सर्व शिक्षकांना त्यांनी अशी विनंती केली की, "नुटाच्या मंडळींनी हा जो प्रयत्न चालविलेला आहे त्याला तुम्ही सर्व लोकांनी सहकार्य करावे असे मला वाटते. आजच्या दौऱ्यामध्ये या मंडळींची ही पहिलीच सभा आहे. तुमच्या पैकी ज्यांना सभासद व्हावयाचे असेल त्यांनी तशी इच्छा व्यक्त केल्यास माझ्यासह आपण सर्वांनी आजीवन सदस्य वर्गणी एकाच रेखांकित धनादेशाद्वारे या मंडळींना इथल्याइथे द्यावी अशी माझी इच्छा आहे. तुम्ही विचार करून सांगा." त्यांच्या या भाषणानंतर तिथल्या तिथे एका कागदावर शिक्षकांनी निवेदन देऊन प्राचार्यांना तशी विनंती केली व त्या एका सभेत सर्व उपस्थित शिक्षक आजीवन सदस्य झालेत. त्यावेळेला नव्याने सदस्य झालेल्या सदस्यांची यादी पत्त्यासकट आम्ही नुटा बुलेटीनमध्ये प्रकाशित करण्याची पद्धत सुरू केलेली होती. त्यामागे दोन हेतू होते. एक म्हणजे कोण कोण सभासद होत आहेत हे इतर सर्वांना कळावे व दुसरे म्हणजे बुलेटीन पाठविण्यासाठी पत्ता चिकटवितांना त्या यादीचा उपयोग व्हावा. सन १९७६ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक ४७ मध्ये क्रमांक २७७ वर "प्रा.आर.आर.कुळकर्णी, प्रिन्सिपल, को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, धामणगाव रेल्वे" असे सदस्याचे नाव व पत्ता नोंदविला असून त्यानंतर २९५ पर्यंतचे सर्व सदस्य हे धामणगाव रेल्वे या एका शहरातील असल्याचे आपल्याला त्याच पृष्ठावर दिसून येईल.

**२९.** 'नुटा बुलेटीन'ची कथा ही कथेमध्ये आडकथा झाली हे मान्यच करावे लागेल. मात्र सम 'भोग' सुखापोटी मोह आवरता आला नाही. ठरल्याप्रमाणे नुटाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक दिनांक १५ ऑगस्ट १९८१ रोजी नागपूर येथे पार पडली. प्रा.मृण्मय भट्टाचार्य स्वतः या सभेमध्ये उपस्थित होते.

**(i)** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या चळवळींचा देशभरातील आढावा घेणारे संक्षिप्त भाषण त्यांनी केले व त्यानंतर "Teachers Movement" हे अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे मुखपत्र म्हणून आपण त्याची नोंदणी केलेली आहे. पहिला अंक ऑगस्ट १९८० मध्ये प्रसिद्ध झालेला आहे. आपल्या भागातील शिक्षकांनी त्याचे कायम वर्गणीदार व्हावे यासाठी आपण मदत करावी अशी विनंती करणारे तपशीलवार भाषण केले. धामणगाव रेल्वे येथील उदाहरण माझ्या अनुभवात असल्यामुळे मी त्या सभेत कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना अशी विनंती केली की, आजच्या आज कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांच्या कायम वर्गणीदार म्हणून होणाऱ्या रक्कमेचा धनादेश कोषाध्यक्ष व सचिव यांनी प्रा.मृण्मय यांच्या सुपूर्त करावा व व्यक्तिशः आपण रेखांकित धनादेशाद्वारे लगेच ती रक्कम संघटनेकडे जमा करू. कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांनी या व्यवस्थेला संमती दिली व त्याप्रमाणे कारवाई करण्यात आली.

**(ii)** नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या त्या दिवशीच्या बैठकीचे कार्यवृत्त हे सन १९८१ च्या कागदपत्रांमध्ये पृष्ठ १३५ वर नोंदविलेले असून त्यातील सुरुवातीचा औपचारिक उपस्थिती दर्शक भाग हा शब्दशः पुढीलप्रमाणे आहे. :- "Minutes of the emergent meeting of the Executive Committee of NUTA held on Saturday, the 15th August 1981 at MLA Rest House, Nagpur. The following members were present :- (1) Shri B.T.Deshmukh (In Chair) (2) Shri D.S.Jajurley (3) Shri S.K.Kalnawat (4) Shri A.V.Barhate (5) Shri E.H.Kathale (6) Shri A.S.Satputaley (7) Shri S.B.Chinchamalatpure (8) Shri B.B.Heda (9) Shri M.M.Tharkar (10) Shri V.K.Pande (11) Shri W.Y.Jagtap (12) Shri P.K.Kotia (13) Shri V.K.Wasu (14) Shri Mrinmoy Bhattacharyya (General Secretary, AIFUCTO)" *(1981-EX-135)*

**(iii)** या बैठकीमध्ये या विषयावर काय निर्णय झाला? याबाबतचे कार्यवृत्त शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**"ITEM NO. (33 B) : AIFUCTO'S SECRETARY VISIT :**

(**A**) The Executive Committee of NUTA welcomed the General Secretary of AIFUCTO - Prof.Mrinmoy Bhattacharyya and held discussions with him on teacher's issues all over India.

**(B)** Prof.M.Bhattacharyya appealled to all the Executive Committee members to become life subscribers of "Teachers' Movement" a quarterly journal of AIFUCTO. Then,

"Resolved that Treasurer and Secretary - NUTA be authorised to send an amount of Rs. 100/- each of all the members present in the Executive Committee meeting dated 15th August 1981 from the current account of NUTA to the AIFUCTO, as their subscription towards "TEACHERS' MOVEMENT" and the concerned members shall pay the said amount to the Treasurer, NUTA by only crossed Demand Draft/ Cheque as early as possible."

**३०.** हे सारे तपशील मी येथे नमूद करण्याचे कारण असे की, प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी किती तळमळीने व जीव ओतून हे काम अंगावर घेतले होते हे २५ वर्षानंतर त्यांनी लिहिलेल्या एका लेखातून लक्षात येते. "Teachers' Movement" या मुखपत्राला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने रौप्य महोत्सवी विशेषांक काढण्यात आला. आता ते अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाचे महासचिव म्हणून निवृत्त झालेले होते व जागतिक प्राध्यापक महासंघाचे ते महासचिव म्हणून कार्यरत होते.

**(i)** प्रा.मृण्मय यांनी लिहिलेला "Silver Jubilee of Teachers' Movement" या मथळ्याचा एक लेख या विशेषांकात प्रसिद्ध *(11/06)* झाला असून त्यामध्ये कायम वर्गणीदार नोंदविण्यासाठी त्यांनी जी धडपड केली त्याविषयीचे तपशील त्यांनी नमूद केलेले आहेत. त्यातील एक लहानसा परिच्छेद शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"Many leaders took initiative in enrolling life-subscribers. **I remember that Prof. B.T. Deshmukh, president of Nagpur University Teachers' Association (NUTA) moved a resolution in a meeting of its executive committee to make every member of NUTA executive committee a life-subscriber of Teachers' Movement.** Dr. V. K. Tiwari now National Secretary of AIFUCTO single-handedly collected largest number of life-subscription of Teachers' Movement. Late Prof. P. Bhaskara Rao the undisputed leader of A.P.A.C.T.A. helped us in a big way by enrolling many life subscribers."

**(ii)** याच लेखामध्ये त्यांनी "Teachers' Movement" चा पहिला अंक केव्हा प्रसिद्ध झाला याबाबतचा सुद्धा उल्लेख केलेला आहे तो शब्दशः पुढीलप्रमाणेः- **"So, the first issue of Teachers' Movement** (that is the name

we chose for our journal and got the name registered with the Press Council of India), a quarterly organ of AIFUCTO **was published in August, 1980.** For the next 25 years Teachers' Movement has come out without interruption."

**(iii)** नुटा बुलेटीन ज्यावेळेला सुरू करण्यात आले तेव्हा संघटनेची आर्थिक परिस्थिती बेताची असतांना बुलेटीन प्रकाशनाचे काम आम्ही सुरू ठेवले. बुलेटीनचे अंक छापून आल्यानंतर घड्या करणे, त्यावर पत्ता चिकटविणे, पोस्टाच्या तिकिटा चिकटविणे, अंक पोस्टात नेऊन टाकणे ही कामे आम्ही शिक्षकच करीत होतो. मी स्वतः, प्रा.ब्रिजमोहन हेडा, प्रा.व्ही.के.वसू, प्रा.श्रीधर चिंचमलातपूरे, प्रा.शितल तिवारी, प्रा.चित्तरंजन असे चार-पाच लोक इतर सहकाऱ्यांना सोबत घेऊन ही कामे करीत असू. "Teachers' Movement" च्या बाबतीत सुरुवातीला अशीच परिस्थिती होती हे वाचून 'समसुखा'चा आनंद झाल्याशिवाय राहत नाही. याबाबतीत प्रा.मृण्मय यांनी त्यांच्या या लेखामध्ये पुढील माहिती नमूद केलेली आहे. :-

**"When new issue of Teachers' Movement reached our office it was a festive occasion. Five or six of us would work together. One would fold the journal. Another would wrap it with a slip of paper. The third teacher would cut the slip of the address. The fourth would paste address slip. The fifth would paste the postage stamp**. ... Among the volunteers in office we had Dr. Sambhunath Ganguly, Prof. Amulya Chandra Bhattacharya, Smt. Arati Lahiri, Dr. Subir Mukhopadhyay, Hironmoy Bhattacharya, and Prof. Mihir Singha Roy."

**३१.** सन १९८० मध्ये महासचिव पदावर निवड झाल्यानंतर प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी केलेल्या धडपडीचा पहिल्या वर्षातील अल्पसा वृत्तांत वर नमूद केलेला आहे. १९८० मध्ये ते महासचिव झाले. Teachers' Movement चा पहिला अंक ऑगस्ट १९८० मध्ये प्रकाशित झाला व ऑगस्ट १९८१ मध्ये ते कायम वर्गणीदार नोंदविण्याची मोहीम घेऊन नागपूर दौऱ्यावर आले होते. ही त्यांची धडपड पुढचे पाच-सात वर्षे व त्यानंतरसुद्धा सातत्याने चालूच होती. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजराथपासून आसामपर्यंत अनेक घटक संघटनांना त्यांनी भेटी दिल्या व मार्गदर्शन केले. विविध राज्यस्तरीय घटक संघटनांना एका देशव्यापी आंदोलनासाठी तयार करण्याच्या त्यांच्या या धडपडीतून घटक संघटनांच्या बांधणीबरोबरच राज्यस्तरीय संघटनांच्या नेत्यांचा एक विश्वासू असा मित्रवर्ग देशभर त्यांच्याशी जोडल्या गेला. **अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ व घटक संघटनांची या संघर्षासाठी मजबूत बांधणी झालेली आहे हे लक्षात आल्यानंतर चौथ्या वेतन आयोगाचे निमित्त झाले आणि ही बांधणी उपयोगाला आली.** देशभर कामबंद आंदोलन हे लहान काम नाही. यापूर्वी असे आंदोलन कधीही झालेले नव्हते याची त्यांना जाणीव होती.

**३२.** चौथ्या वेतन आयोगाच्या बाबतीत मेहरोत्रा समितीचा अहवाल समोर आला आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने त्याबाबतीत आपले निर्णय घेऊन तो अहवाल केंद्रशासनाकडे पाठविला. केंद्रशासनाने दिनांक १७ जून १९८७ रोजी एक वृत्तपत्रीय प्रसारण काढून याबाबतचे आपले निर्णय जाहीर केले. **तीन प्रकारचे 'लेक्चरर्स', दोन प्रकारचे 'रिडर्स' व दोन प्रकारचे 'प्रोफेसर्स'** व त्यांच्या वेगवेगळ्या वेतनश्रेण्यांसह श्रेण्यांची जी रेलचेल मेहरोत्रा समितीच्या अहवालात करण्यात आलेली होती त्याला महासंघाचा तीव्र विरोध होता. महासंघाचे त्याबाबतीत असे म्हणणे होते की, १९४८ चा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन समितीचा अहवाल, तसेच १९७३ चा सेन समितीचा अहवाल काळजीपूर्वक पाहिला तर विद्यापीठे व महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षकांच्या श्रेण्या (Grades) या मर्यादित असाव्यात, या अतिशय प्रतिष्ठित शिफारशींना खो देण्यात आलेला आहे व त्यामुळेच श्रेण्यांच्या या बहुलतेला (multiplicity of grades) महासंघाचा विरोध होता.

**३३. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाची मागणी अशी होती की, प्रशासनाच्या क्षेत्रामध्ये सनदी अधिकाऱ्यांचा वर्ग हा सर्वात वरचा वर्ग आहे तसेच शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा वर्ग हा सर्वात वरचा वर्ग आहे आणि त्यामुळे यांच्या वेतनश्रेण्यांमध्ये समतूल्यता असावी. सनदी अधिकाऱ्यांना किमान दोन 'प्रमोशन्स' त्यांच्या सेवेमध्ये दिले जातात. तसे ते विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुद्धा दिले जावेत.** केंद्रशासन ही गोष्ट मान्य करायला तयार नव्हते. दिनांक ४ ऑगस्ट, १९८७ रोजी देशभरातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा बेमुदत संप सुरू झाला. पहिले पंधरा दिवस केंद्रशासनातर्फे कोणी बोलायला तयार नव्हते. चर्चेची सर्व दारे बंद असल्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली होती.

**३४.** दिनांक २० ऑगस्ट १९८७ रोजी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची (NEC) बैठक झाली. एवढ्या मोठ्या देशव्यापी आंदोलनानंतरसुद्धा केंद्रशासनातर्फे कोणी बोलायला तयार नाही याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली व आंदोलन आणखी तीव्र करण्याचे काही निर्णय घेण्यात आले. देशभरातून हजारो नागरिकांच्या सहीने पंतप्रधानांना निवेदन पाठविणे, दिनांक ३१ ऑगस्ट १९८७ व १ सप्टेंबर १९८७ या दोन दिवशी सवंध देशभर जेलभरो आंदोलनाचा कार्यक्रम राबविणे व दिनांक ५ सप्टेंबर १९८७ रोजी दिल्ली या राष्ट्रीय राजधानीमध्ये सविनय कायदेभंगाचे आंदोलन आयोजित करणे अशा कार्यक्रमाचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. **"सर्व दारे जेव्हा बंद होतात तेव्हा कुठे तरी एखादी खिडकी उघडलेली असते. तेव्हा कोणताही प्रश्न अधांतरी सोडू नका ! मध्येच गलितगात्र होऊ नका ! (A window opens up when all doors have closed : Never Give Up)" हा प्रा.मृण्मय यांना मिळालेला धडा येथे उपयोगी आला.**

**३५.** दिनांक ३१ ऑगस्ट १९८७ व १ सप्टेंबर १९८७ रोजी देशभरात जेलभरो आंदोलन यशस्वीपणे पार पडले व दिनांक ५ सप्टेंबर १९८७ रोजीची जोरात तयारी सुरू झाली तेव्हा केंद्रशासनाच्या शिक्षण विभागाचे सचिव श्री.अनिल बोरडीया हे स्वतः पदाधिकाऱ्यांना चर्चेसाठी यावे असे सांगण्यासाठी महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांना भेटायला आले. **दिनांक ४ सप्टेंबर १९८७ रोजी हा संप यशस्वीपणे संपुष्टात आला व आंदोलन मागे घेण्यात आले.**

**३६.** या आंदोलनाच्या उपलब्धीविषयी असे म्हणता येईल की, अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाला अतिशय उत्तम यश या कामी मिळाले होते. ४ सप्टेंबर, १९८७ चे केंद्रशासनाच्या मानव संसाधन विभागाच्या मंत्र्यांचे निवेदन, ५ सप्टेंबर, १९८७ चे विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. यशपाल यांचे पत्र व त्यानंतर केंद्रशासनाचे सचिव श्री. अनिल बोरडीया यांचे दिनांक ७ सप्टेंबर, १९८७ चे पत्र विचारात घेता पुढील अतिशय मोठ्या उपलब्धी या आंदोलनाने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना मिळवून दिलेल्या होत्या.

(१) ७००-१६०० च्या एकाच धावत्या वेतनश्रेणीमध्ये सर्व सेवाकाळ व्यतीत करण्याची स्थिती संपुष्टात आली. **मूळ वेतनश्रेणी, वरिष्ठ वेतन श्रेणी व रिडर/निवड वेतन श्रेणी अशा तीन वेतनश्रेण्यांच्या उतरंडीमध्ये दोन कालबद्ध पदोन्नतीच्या संधी शिक्षकांना उपलब्ध होण्याच्या कालखंडाची सुरुवात या चौथ्या वेतन आयोगापासून झाली. ही एक फार मोठी उपलब्धी होती.**

(२) पीएच.डी. असेल तर रिडर या पदनामासह ३७००-५७०० ची वरची वेतनश्रेणी लागू केल्या जाईल. मात्र पीएच.डी. नसल्यास जी वेतनश्रेणी दिल्या जाईल ती ३७००-५३०० ची असेल, ही योजना शासनाला गुंडाळून ठेवावी लागली. या दोनही परिस्थितीत ३७००-५७०० हीच वेतनश्रेणी दिली जाईल, हे सुनिश्चित झाले. **'सिलेक्शन ग्रेड लेक्चरर'** अशा पदनामाचा स्पष्ट उल्लेख सर्वप्रथम केंद्राचे शिक्षण सचिव श्री.अनिल बोरडीया यांच्या पत्रामध्ये आलेला आहे.

(३) मूळ वेतनश्रेणीत १० वर्षे काढल्यानंतर वरिष्ठ वेतनश्रेणी (Senior Scale) व त्या वेतनश्रेणीत १० वर्षे काढल्यानंतर निवडश्रेणी (Selection Grade) देण्याची योजना शासनाला गुंडाळून ठेवावी लागली. २० वर्षांच्या ऐवजी १६ वर्षांचा कालखंड (८ + ८) निवडश्रेणी मिळविण्यासाठी आवश्यक असेल अशी योजना अस्तित्वात आली.

(४) अधिव्याख्याता म्हणून नेमणूक होत असतांना पीएच.डी. किंवा एम्.फिल. ही पात्रता धारण करणाऱ्याला नेमणुकीच्या वेळेस ३ व १ अशा आगाऊ वेतनवाढी देण्याची व्यवस्था अंमलात आली.

**३७.** सन १९८७ मध्ये आलेला आंदोलनाचा अनुभव महासंघाला १९९८ मध्ये चांगलाच कामी आला. विद्यापीठ अनुदान आयोगाने श्री.रस्तोगी यांच्या अध्यक्षतेखाली Pay Review Committee - PRC ची नेमणूक केली. या समितीचा अहवाल आल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या शिफारशी केंद्रशासनाकडे पाठविल्या. केंद्र शासनाच्या मानव संसाधन मंत्रालयाने दिनांक २७ जुलै १९९८ रोजीच्या पत्रान्वये (No.F 1-22/97-U-1) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या सुधारणेबाबत जो प्रस्ताव सर्व राज्यांच्या सचिवांना कळविलेला होता त्यामध्ये अनेक निकृष्ट व टाकाऊ अशा तरतुदींचा समावेश होता. केंद्रशासनाच्या निर्णयामध्ये असलेले अनेक दोष लक्षात घेता **दिनांक ११ ऑगस्ट १९९८ पासून देशभर कामबंद आंदोलन सुरू** करण्याचा निर्णय अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने घेतला. यावेळेला सुद्धा जुनाच अनुभव आला. सुरुवातीला केंद्रशासनातर्फे कोणीही चर्चा करायला तयार नव्हते. आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय महासंघाने घेतल्यानंतर मात्र हालचाली सुरू झाल्यात.

**३८.** दिनांक ५ सप्टेंबर १९९८ रोजी केंद्रीय शिक्षण मंत्री व मानव संसाधन विभागातील अधिकारी यांच्यामध्ये चर्चेच्या अनेक फैरी झाल्यात. या वेगवान घडामोडीमध्ये दिनांक ५ सप्टेंबर १९९८ रोजी उभय पक्षात चर्चेच्या

फलितांची लेखी देवाण घेवाण झाली. त्याच दिवशी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ व केंद्राचे शिक्षण मंत्री यांच्यामध्ये काय चर्चा झाली? त्या चर्चेचे कार्यवृत्त केंद्रीय शिक्षण खात्याच्या सचिवांनी लेखी स्वरूपात अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या सुपूर्द केले व त्याच दिवशी म्हणजे **दिनांक ५ सप्टेंबर १९९८ रोजी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या सचिव मंडळाची बैठक होऊन आंदोलन मागे घेण्याबाबतचा ठराव संमत करण्यात आला.**

**३९.** दिनांक ५ सप्टेंबर १९९८ रोजी झालेल्या चर्चेचे कार्यवृत्त व त्यानुसार पुढे केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाने काढलेली दिनांक ६ नोव्हेंबर १९९८ रोजीची अधिसूचना यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येईल की, २७ जुलै १९९८ रोजी जाहीर केलेल्या अधिसूचनेमध्ये (यापुढे उल्लेख "मूळ अधिसूचना" असा) ६ नोव्हेंबर १९९८ च्या अधिसूचनेने (यापुढे उल्लेख "सुधारणा अधिसूचना" असा) अनेक अनुकूल बदल केलेले होते. हे बदल कोणकोणते होते याची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

(1) "The State Governments, after taking local conditions into consideration, **may also decide in their discretion, to introduce scales of pay different from those mentioned in the scheme, and may give effect to the revised scales of pay from January 1, 1996, or a later date."** असा उल्लेख मूळ अधिसूचनेमध्ये होता. याचा अर्थ असा की, १ जानेवारी १९९६ या तारखेपासून किंवा नंतरच्या तारखेपासून वेतनश्रेणी अंमलात आणण्याची मुभा राज्यसरकारांना देण्यात आलेली होती. दिनांक ६ नोव्हेंबर १९९८ च्या सुधारणा अधिसूचनेने ही मुभा काढून घेण्यात आली. सुधारणेच्या या अधिसूचनेमध्ये स्पष्टपणे "The revised scales mentioned in Annexure-I of our letter dated 27-7-1998 shall be effective from 1-1-1996." असा उल्लेख होता. हा बदल ही या आंदोलनाची फार मोठी उपलब्धी होती.

(२) जाहीर केलेल्या वेतनश्रेण्या किंवा राज्यशासनाला वाटल्यास कमी दर्जाच्या वेतनश्रेण्या देण्याची राज्यशासनाला मूळ अधिसूचनेमध्ये देण्यात आलेली मुभा सुद्धा सुधारित अधिसूचनेने काढून टाकली होती.

(३) निवडश्रेणी अधिव्याख्याता या पदावर ५ वर्षे ज्यांनी सेवा केलेली आहे अशा शिक्षकांना प्रोफेसर पदापर्यंत आश्वासित प्रगती योजनेच्या अंतर्गत पदोन्नतीची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी मान्य करण्यात आलेली नव्हती. मात्र त्या ऐवजी ३७००-५७०० च्या वेतनश्रेणीत काम करणाऱ्या अशा अधिव्याख्यात्याला १.१.१९९६ रोजी १२०००-१८३०० या वेतनश्रेणीत १४९४० च्या उच्च स्तरावर वेतननिश्चिती करून देण्यात येईल ही बाब सुधारित अधिसूचनेने मान्य केलेली होती. मूळ योजनेत उपलब्ध नसलेली ही सुविधा सुधारित अधिसूचनेमुळे उपलब्ध झालेली होती.

(४) ३०००-५००० च्या वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या रिडर व ४५००-५७०० वेतनश्रेणीमध्ये कार्यरत प्रोफेसर यांना अनुक्रमे १००००-१८००० व १६४००-२२४०० या नव्या वेतनश्रेणीत १.१.१९९६ पासून यथोचित वरच्या स्तरावर वेतन देण्याची बाब सुधारित अधिसूचनेने मान्य केलेली होती.

(५) जे अधिव्याख्याते एम.फील किंवा पीएच.डी या संशोधनात्मक पदवीसाठी काम करीत असतील त्यांच्या मार्गदर्शकांना त्यांचे काम समाधानकारक आहे असे वाटत असेल तर त्याबाबतीत नगदी भत्त्याच्या स्वरूपात किंवा वस्तूच्या स्वरूपात किंवा दोनही रूपाने व्यावसायिक उत्तेजन म्हणून सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे तयार केली जाईल असेही सुधारित योजनेत नमूद होते.

(६) विद्यापीठाच्या कुलसचिवाला जी वेतनश्रेणी लागू असेल ती वेतनश्रेणी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक व वित्त अधिकारी यांनाही लागू करण्यात येईल असेही सुधारित योजनेमध्ये नमूद करण्यात आले होते.

(७) शिक्षकांसाठीचे सेवानिवृत्तीचे वय हे रजिस्ट्रार, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण विभागात काम करणारे शिक्षक, परीक्षा नियंत्रक व वित्त अधिकारी यांनाही लागू राहील असेही या सुधारणेच्या अधिसूचनेमध्ये नमूद होते.

**४०.** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या व्यावसायिक जीवनाची स्थिती सुस्थितीवर नेऊन पोहचविणाऱ्या १९८७ व १९९८ या दोनही अखिल भारतीय स्तरावरील आंदोलनाचे कर्णधार हे निर्विवादपणे प्रा.मृण्मय भट्टाचार्य हेच होते. संघर्षाचा किंवा लढाईचा कर्णधार/सरसेनापती हा कितीही उच्च गुणवत्तेचा असला तरी त्याला सैनिकांची उत्तम साथ आवश्यक असते. देशभरातील घटक संघटनांनी याबाबतीत उत्तम बांधणी केली, त्याचबरोबर अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी, सचिव मंडळांनी व राष्ट्रीय कार्यकारिणीने या बांधणीमध्ये जो सहभाग घेतला त्यांचाही फार मोठा वाटा या यशामध्ये आहे हे नमूद केलेच पाहिजे. "**सर्व दारे जेव्हा बंद होतात तेव्हा कुठे तरी एखादी खिडकी उघडलेली असते. तेव्हा कोणताही प्रश्न अधांतरी सोडू नका ! मध्येच गलितगात्र होऊ नका ! (A window opens up when all doors have closed : Never Give Up)"** हा त्यांना बालवयातच मिळालेला धडा त्यांनी आयुष्यभर लक्षात ठेवला. या त्यांच्या अनुभवाने अखिल भारतीय प्राध्यापक महासंघ व देशातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक वर्ग मोठ्या प्रमाणात लाभान्वित झाला. **एकूण २७० पृष्ठांचे जे आत्मचरित्र त्यांनी लिहिलेले आहे त्या आत्मचरित्राचा मुख्य मथळा "Never Give Up" असा असून उपमथळा "An extraordinary story of how a window opens up when all doors have closed " असा आहे.**

**४१.** वारकरी संप्रदायाच्या कीर्तन परंपरेमध्ये कीर्तनाची सुरुवात निरुपणाच्या अंभगाने करतात. **"Never Give Up"** हा निरुपणाचा 'अभंग' मी पहिल्याच परिच्छेदात उधृत केला आहे. त्या अभंगाला धरून निरुपण पूर्वरंगामध्ये केले जाते. उत्तररंगामध्ये निरुपणाचा अभंग धरून आख्यान व शेवटी आख्यान पर्यवसान आरंभीच्या निरुपणाच्या अभंगाने केले जाते. आरंभीच्या अभंगाच्या पुनःकथनाने मी या अभिवादनाचा शेवट करण्याचे ठरविले आहे. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाची स्थापना (AIFUCTO) १९६४ मध्ये झाली. १९६४ ते १९६६ अशी सुरुवातीची दोन वर्षे प्रा.हृदय नारायण सिंग हे महासचिव होते. १९६६ पासून १९६९ पर्यंत प्रा.दिलीप चक्रवर्ती, १९६९ ते १९७१ पर्यंत प्रा.अबानी बोराल, १९७१ ते १९८० पर्यंत प्रा. अमिया दासगुप्ता हे AIFUCTO चे महासचिव होते. त्यानंतर १९८० पासून तर १९९९ च्या भोपाळ अधिवेशनापर्यंत सलग जवळ जवळ २० वर्षे प्रा.मृण्मय भट्टाचार्य यांनी महासचिव पदावरून संघटनेचे नेतृत्त्व केले. त्यांच्यापूर्वी किंवा त्यांच्यानंतर (२०२३ पर्यंत) इतकी संधी दुसऱ्या कोणत्याही महासचिवाला मिळाली नाही. जवळ जवळ २० वर्षे लागोपाठ एकमताने निवड होऊन त्या पदावर कार्य केलेले ते एकमेव महासचिव. **केवळ २० वर्षे ते महासचिव पदावर कार्यरत होते याही पेक्षा त्या कार्यकाळात अतिशय कष्टपूर्वक त्यांनी संघटनेची बांधणी केली व १९८७ तसेच १९९८ अशी दोन अखिल भारतीय स्वरूपाची बेमुदत कामबंद आंदोलने उभी करून त्यांनी या व्यवसायाला प्रतिष्ठित करण्यासाठीची अद्वितीय कामगिरी केली.** अशी आंदोलने किंवा आंदोलन मृण्मयपूर्व काळात किंवा मृण्मयोत्तर काळात झाली नाहीत, हेसुद्धा लक्षात घेतले पाहिजे. भोपाळच्या अधिवेशनात त्यांच्यानंतर प्रा.बी.विजयकुमार यांची महासचिव म्हणून निवड झाली. त्यांनी आपल्या शोकसंदेशात "It is not an exaggeration to say that by his death university/ college teachers in the country lost their Godfather." ही जी भावना व्यक्त केली आहे, त्यामागील मर्म समजून घेतले पाहिजे. **"A window opens up when all doors have closed : Never Give Up"** या मंत्राने आमच्या पिढीला भारून टाकणाऱ्या संघटनेच्या या सर्वश्रेष्ठ सरसेनापतीला मनःपूर्वक अभिवादन!

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 20.12.2023) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.01.2024**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---

To,..........................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................